**ठळक बातम्या**

- मराठी न येणाऱ्या रिक्षा आणि टॅक्सी चालकांवर कुठलीही कारवाई न करण्याचा राज्य सरकारचा निर्णय

- डिजिटल अटकेच्या प्रकरणात सहभागी असलेल्या सुमारे ९ हजार मोबाइल क्रमांकांवर गेल्या ४ महिन्यात व्हॉट्सअपची कारवाई

- राज्यात विविध ठिकाणी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आज मतदान

आणि

- थॉमस - उबर बॅडमिंटन स्पर्धेतलं भारतीय महिला संघाचं आव्हान संपुष्टात

**<><><><><>**

मराठी न येणाऱ्या रिक्षा आणि टॅक्सी चालकांवर कुठलीही कारवाई न करण्याचा किंवा त्यांचा परवाना रद्द न करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. या चालकांना मराठी शिकवण्यासाठी १ मे ते १५ ऑगस्ट दरम्यान मोहिम राबवली जाईल, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. परिवहन विभागातल्या अधिकाऱ्यांची बैठक घेतल्यावर ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. मराठी प्रशिक्षणासाठी परिवहन विभाग एक समिती स्थापन करेल, ही समिती ज्यांना मराठीत संवाद साधता येत नाही त्यांची नोंद ठेवेल. तसंच ज्यांना मराठी शिकण्याची इच्छा आहे, त्यांना आरटीओ कार्यालयात जागा उपलब्ध करून दिली जाईल, पुस्तकं उपलब्ध करून दिले जातील असं परिवहन मंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

**-- होल्ड बाईट सरनाईक - -**

या कालावधीत बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या, प्रवाशांची फसवणूक करणाऱ्या, तसंच नियमांचं उल्लंघन करणाऱ्या चालकांवर कारवाई केली जाईल, त्यांचा परवानाही रद्द केला जाऊ शकतो असं सरनाईक यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

डिजिटल अटकेच्या प्रकारात सहभागी असलेल्या ९ हजार ४०० मोबाइल क्रमांकांवर जानेवारीपासून व्हॉट्सॲपने बंदी घातल्याची माहिती केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात

दिली आहे. रिझर्व्ह बँक, तंत्रज्ञान कंपन्या आणि सीबीआय यांच्या सहकार्याने ही कारवाई करण्यात आली आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने स्वतःहून खटला दाखल करून घेतला होता. न्यायालयाने रिझर्व्ह बँक, दूरसंचार विभाग आणि संबंधित संस्थांना डिजिटल अटकेच्या प्रकरणांमध्ये नुकसान भरपाई देण्यासाठी एक आराखडा तयार करण्याकरता संयुक्तपणे बैठक घेण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार व्हॉट्सॲपने ही कारवाई केली आहे.

**<><><><><>**

अमली पदार्थांचा तस्कर मोहम्मद सलीम डोला याला आज पहाटे तुर्कस्तानातून भारतात परत आणलं असून, अमली पदार्थ नियंत्रण संस्थेचं हे मोठं यश असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. सलीम डोला हा कुख्यात गुंड दाऊद इब्राहिम याचा हस्तक असून, गुप्तचर यंत्रणांनी आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहकार्यानं त्याच्या प्रत्यार्पणाची कारवाई अमलात आणली.

**<><><><><>**

रत्नागिरीच्या चार तालुक्यांतल्या १३ ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकांसाठी तर भंडारा जिल्ह्यात ग्रामपंचायतीच्या ५३ जागांसाठी तर १३ ठिकाणी सरपंचपदासाठी आज मतदान होत आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात निवडणूक कार्यक्रम लागू असलेल्या ग्रामपंचायत क्षेत्रात जिल्हाधिकारी मनुज जिंदल यांनी सुट्टी जाहीर केली आहे. भंडारा जिल्ह्यात १३ ठिकाणी सरपंचपदासाठी थेट जनतेमधून निवड होणार असल्याने सबंधित गावांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

**<><><><><>**

कोल्हापूरातले प्रकाशक प्रशांत आंबी यांना बुलढाणा पोलिसांनी स्थानबद्ध केलं आहे. आमदार संजय गायकवाड यांनी शिवीगाळ तसंच धमकी दिल्याच्या निषेधार्थ बुलढाणा इथं ते आंदोलन करत होते. भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट तसंच इतर पुरोगामी संघटनांचे कार्यकर्ते सकाळीच बुलढाण्यामधे जिजामाता मैदानावर एकत्र जमले. दुसरीकडे संजय गायकवाड यांचे समर्थकही मोठ्या संख्येने या ठिकाणी जमल्यामुळे दोन्ही बाजूंनी

घोषणाजी सुरू होऊन तणावाचं वातावरण निर्माण झालं, त्यामुळे पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेऊन स्थानबद्ध केलं आहे.

<><><><><>

मनी लॉन्ड्रींग प्रकरणी ‘रिलायन्स अनिल अंबानी ग्रुप’ कंपन्यांविरोधात सुरु असलेल्या चौकशीचा भाग म्हणून, ईडी, अर्थात सक्तवसुली संचालनालयानं आज केलेल्या आणखी एका कारवाईत ३ हजार ३४ कोटी रुपयांच्या मालमत्तेवर जप्तीची आणली. जप्त केलेली मालमत्ता रिलायन्स कम्युनिकेशन्स आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, या कंपन्यांच्या मालकीची असल्याचं संबंधित सूत्रांनी सांगितलं.

रिलायन्स अनिल अंबानी ग्रुप विरोधात केलेल्या कारवाईत आतापर्यंत जप्त केलेल्या मालमत्तेची एकूण किंमत १९ हजार ३४४ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. बँक फसवणूक आणि निधीचा अपहार केल्याच्या आरोपांखाली ही चौकशी सुरू आहे.

<><><><><>

दहशतवाद, फुटीरतावाद आणि अतिरेकी कारवायांविरोधात एकजुटीनं आघाडी उभारण्याची गरज असल्याचं संरक्षण मंत्री  राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज किर्गिझस्तानमध्ये  बिश्केक इथं शांघाय सहकार्य संघटनेच्या संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीत बोलत होते. एखाद्या देशाच्या सार्वभौमत्वावर हल्ला करणाऱ्या सीमापार दहशतवादाला प्रोत्साहन देणाऱ्यांकडे दुर्लक्ष करता कामा नाही, तसंच दहशतवादाला सुरक्षित आश्रयस्थान उपलब्ध करणाऱ्यांविरोधात शांघाय सहकार्य संघटनेनं कठोर कारवाई करायला हवी, असं ते म्हणाले. जागतिक अस्थिरतेच्या काळात, जगातले अनेक देश आत्मकेंद्रीत होत असून, अशा वेळी शांघाय सहकार्य संघटनेची भूमिका अत्यंत महत्वाची असल्याचं राजनाथ सिंह  म्हणाले.

-   **- होल्ड राजनाथ बाइट - - -**

सुरक्षा विषयक आव्हानांची सामायिक जाणीव निर्माण होण्यासाठी तसंच संरक्षण क्षेत्रातल्या भविष्यातल्या सहकार्याच्या शक्यता पडताळून पाहण्यासाठी आजची बैठक उपयोगी ठरेल, असं ते म्हणाले.

<><><><><>

महाराष्ट्र पोलीस दलाने बदलत्या काळातील सायबर आणि आर्थिक गुन्ह्यांसारख्या आव्हानांना सामोरे जात अधिक सज्जतेने काम करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

कलिना इथल्या सशस्त्र पोलीस मुख्यालयाच्या क्रीडांगणावर ३६ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा-२०२६ च्या समारोप आणि बक्षीस वितरण कार्यक्रमात ते काल बोलत होते. या स्पर्धेत यजमान मुंबई संघाने पुरुष आणि महिला गटात उत्कृष्ट संघाचा किताब पटकावला.

<><><><><>

सोलापूर जिल्ह्यातल्या बार्शी इथल्या १२ व्या शतकातल्या हेमाडपंथी शैलीतल्या भगवान विष्णू मंदिराचा विकास आराखडा प्रशासनाकडे सादर झाला आहे. हा आराखडा राज्य शिखर समितीकडे आल्यानंतर त्यात प्रस्तावित कामांना सरकार मंजुरी देईल आणि निधी देईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी दिली. श्री भगवंत प्रकट दिनानिमित्त या मंदिरात झालेल्या धार्मिक कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस सहभागी झाले होते. त्यानंतर बार्शी शहरात प्रधानमंत्री आवास योजना आणि रमाई आवास योजनेअंतर्गत घरकूल लाभार्थ्यांना त्यांच्या हस्ते घराच्या किल्ल्या देण्यात आल्या.

//<><><><><>//